यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479

परीक्षा विभाग / Examination Division

जा.क्र./पनिका- / २०२४/ १६६३ दि. ११.०२.२०२४

दीक्षांत समारंभ उपस्थितीसाठी नोंदणीबाबत

विद्यापीठाचा ३० वा दीक्षांत (पदवीदान) समारंभ सोमवार दि. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी नाशिक येथे विद्यापीठ मुख्यालयातील प्रांगणात सकाळी ९.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. त्यामध्ये २०२३-२०२४ ह्या वर्षात (डिसेंबर २०२३, मार्च २०२४ व मे/जून २०२४ ह्या परीक्षांमध्ये) उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. या प्रसंगी आपण विद्यापीठ मुख्यालय, नाशिक येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करण्यासाठी येणार असाल तर आपण https://30convocation.ycmou.ac.in/attendance या लिंकवर जाऊन आपल्या उपस्थिती बाबतची माहिती कृपया ऑनलाईन पद्धतीने भरावी. सदरची लिंक दि. १०/०२/२०२५ ते दि. १६/०२/२०२५ या कालावधीत सुरू राहील व या कालावधीतच नोंदणी करता येईल, यास मुदतवाढ मिळणार नाही. आपण ऑनलाईन नोंदणी केल्यानंतरच आपणांस येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करता येईल. नाशिक येथे दीक्षांत समारोहाच्या दिवशी सकाळी ठीक ८.०० वाजता हजर राहून ऑनलाईन अनामत रक्कम रु.५००/- भरून दीक्षांत शाल घ्यावी लागेल. अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने आधी देखील भरता येईल. अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरणेबाबत तसेच दीक्षांत समारोहासंबंधीची सर्व माहिती समारंभापूर्वी विद्यापीठाच्या वेबसाइटवर https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=28329 या लिंकवर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाईल, ती विद्यार्थ्यांनी पहावी. ज्या विद्यार्थ्यांनी ह्या वेब पेजवर आपल्या उपस्थिती बाबतची ऑनलाईन स्वीकृती नोंदवली आहे त्यांनाच दीक्षांत समारोहाच्या दिवशी पदविका/ पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील. ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली नाही, त्यांची पदविका/ पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारोहानंतर काही कालावधीत त्यांच्या अभ्यासकेंद्रामार्फत वितरीत केली जातील, त्यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. नोंदणी न करता आलेल्या विद्यार्थ्यांना पदविका/ पदवी प्रमाणपत्र दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

Ph.D. ह्या पदवीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी येथे उपस्थितीबाबत माहिती नोंदविण्याची आवश्यकता नाही. त्यांची उपस्थिती ग्राह्य धरण्यात आलेली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ज्ञानगंगा घरोघरी नाशिक

(भटूप्रसाद पाटील)
परीक्षा नियंत्रक